मा. महासभा क्र.०३
विशेष सभा

ठराव क्र. १६
दि. ०२/०३/२०२६

विषय क्र. २ : इचलकरंजी महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळांमध्ये प्रवेश घेणेसाठी शहरातील नागरिकांना प्रोत्साहन मिळावे यासाठी सन २०२६ / २०२७ या शैक्षणिक वर्षामध्ये इचलकरंजी महानगरपालिका प्राथमिक शाळांमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे पालकांना घरफाळ्यामध्ये सवलत देणेबाबत.

## ठराव

इचलकरंजी महानगरपालिका क्षेत्रांतर्गत कार्यरत असलेल्या प्राथमिक शाळांमधील विद्यार्थी पटसंख्येत वाढावी या अनुषंगाने मा. नगरसेविका सौ. तेजश्री अमृत भोसले यांनी दि. २४/०२/२०२६ चे पत्राद्वारे महानगरपालिका शाळांचे अस्तित्व टिकवण्यासाठी आणि पटसंख्या वृद्धीसाठी महापालिकेच्या शाळेमध्ये ज्या पालकांनी आपल्या पाल्यास शिक्षणासाठी प्रवेश घेतला आहे त्यांच्या घरफाळयामध्ये सवलत देणेची मागणी केली आहे.

मा. सदस्य यांचे मागणीबाबत कार्यालयाने महानगरपालिका शाळांचे संवर्धन आणि सामाजिक शैक्षणिक हित लक्षात घेता हा प्रस्ताव अत्यंत स्तुत्य आहे. तथापि सदर बाब ही महानगरपालिकेच्या आर्थिक धोरणाशी निगडीत असुन या योजनेची अंमलबजावणी करणेपुर्वी, सवलतीचे प्रमाण निश्चित करणे, आणि या सवलतीमुळे होणारा अंदाजित "वित्तीय भार" तसेच त्याचा कर विभागाच्या आर्थिक उद्धीष्टावर होणारा परिणाम याबाबतचा अभिप्राय प्राप्त करुण निर्णय घेणे उचीत ठरेल. असा प्रस्ताव शिक्षण विभागाने दिला आहे.

महाराष्ट्र अधिनियम १४० (ब) नुसार परिस्थीतीकीय दृष्ट्या लाभदायक योजनेची अंमलबजावणी करणेकरीता मालमत्ता करात सुट किंवा परतावा देणेच्या प्रयोजनार्थ राज्य शासन किंवा महानगरपालिका ठरवून देईल अशा परिस्थितीकीय दृष्टया लाभदायक योजनेची अंमलबजावणी करणेत येत असेल अशा जमिनीच्या आणि इमारतींच्या बाबतीत महानगरपालिका, सर्वसाधारण वा विशेष आदेशाद्वारे निर्धारीत करील अशा दराने मालमत्ता कर भरणेतुन सुट किंवा परतावा देईल आणि परिस्थितीकीय दृष्ट्या लाभदायक योजनेची अंमलबजावणी करणेकरीता आणि ती चालू ठेवणेकरीता उपाययोजनांची मर्यादा लक्षात घेऊन सुट किंवा परतावा देणेचे वेगवेगळे दर निर्धारीत करता येतील अशी तरतूद आहे.

वरील प्रमाणे महाराष्ट्र अधिनियम १४० (ब) ची तरतुद विचारात घेवून परिस्थितीकीय दृष्ट्या लाभदायक योजना अंतर्गत सन २०२६ / २७ या शैक्षणिक वर्षासाठी इयत्ता पहिली करिता इचलकरंजी महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळांमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांना एका निवासी मिळकती करिता सन २०२६ / २७ च्या संयुक्त करा मध्ये ५% सवलत देण्यात यावी तसा प्रस्ताव शासन मान्यतेसाठी पाठवून शासन मान्यतेनंतर त्यांची अंमलबजावणी करण्यात यावी.

तसेच शाळांची साफसफाई, शाळेमधील मुताऱ्या व संडास यांची साफसफाई, क्रीडांगणाची सुव्यवस्था याबाबत लगतच्या शिक्षण समिती बैठकीत निर्णय घेऊन त्यांची अंमलबजावणी करणेत यावी.

सर्व शाळा इमारतींचे बांधकाम दुरुस्ती व रंगरंगोटी साठी अंदाजपत्रक तयार करून त्याप्रमाणे पुढील उचित कार्यवाही करणे करिता हि सभा मंजुरी देत आहे.

सूचक : स. व. मुळीक.

अनुमोदक : A.P. Bachate सौ. अ. प्र. बचाटे.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

मा. महासभा क्र.०३
विशेष सभा

ठराव क्र. ९५
दि. ०२/०३/२०२६

विषय क्र. १ : इचलकरंजी महानगरपालिकेमार्फत महिला महोत्सवाचे आयोजन दरवर्षी करण्यात येते सध्या नुकत्याच इचलकरंजी महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुका झालेल्या आहेत व अद्याप महिला व बालकल्याण समितीचे कामकाज सुरू झालेले नाही व ८ मार्च रोजी महिला दिन आहे, यासाठी तात्काळ कार्यवाही व्हावी म्हणून महिला महोत्सवाचे आयोजना कामी विशेष महासभेचे आयोजन करणेबाबत इचलकरंजी महानगरपालिकेच्या मा. नगरसेविका यांनी दि. २४/०२/२०२६ रोजीचे निवेदनाद्वारे मागणी केलेबाबत.

**ठराव**

इचलकरंजी महानगरपालिकेमार्फत महिला महोत्सवाचे आयोजन दरवर्षी करण्यात येते. सध्या नुकत्याच इचलकरंजी महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुका झालेल्या आहेत व अद्याप महिला व बालकल्याण समितीचे कामकाज सुरू झालेले नाही व ८ मार्च रोजी महिला दिन आहे, यासाठी तात्काळ कार्यवाही व्हावी म्हणून महिला महोत्सवाचे आयोजना कामी विशेष महासभेचे आयोजन करणेबाबत इचलकरंजी महानगरपालिकेच्या मा. नगरसेविका यांनी दि. २४/०२/२०२६ रोजीचे निवेदनाद्वारे मागणी केली आहे.

मा. सदस्य यांनी मागणी केलेनुसार इचलकरंजी महानगरपालिका महिला व बालविकास विभागामार्फत जागतिक महिला दिनानिमित्त महिलांच्या विविध स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन, बचत गटांचे खाद्य पदार्थ, घरगुती उपयोगी वस्तु इत्यादी तसेच शहरातील उद्योजक महिलांना उत्पादनाचे विविध प्रकारांचे स्टॉल उभारणी तसेच महिलांना स्वतःच्या उन्नतीसाठी प्रोत्साहित करणेसाठी समाजातील उत्कृष्ठ कामगिरी बजावलेल्या महिलांचे व्याख्यान आयोजित करणे व त्यांचा यथोचित गौरव करणे असे संयुक्तीकरित्या कार्यक्रमाचे आयोजन करणे तसेच शहरातील महिला व मुलींच्या कलागुणांना वाव मिळणेसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्याचा निर्णय घेणे बाबत धोरणात्मक निर्णय होणे आवश्यक असलेचे नमुद करणेत येवून. सदर उपक्रम आयोजनाबाबत महीला व बालविकास विभागाकडे रु. १५ लाखांची शिल्लक अर्थसंकल्पीय तरतुद असलेबाबत प्रशासनाकडुन सादर करणेत आलेला अहवाल अवलोकनी घेणेत आला.

इचलकरंजी महानगरपालिका महीला व बालविकास विभागामार्फत आयोजित करणेत येणाऱ्या ८ मार्च जागतिक महिला दिनानिमीत्त महिला महोत्सव २०२६ या उपक्रमाचे आयोजनास मान्यता देणेत येत आहे. सदर उपक्रम हा दि. ८,९,१० व ११ मार्च २०२६ या कालावधीत महानगरपालिकेच्या श्रीमंत ना. बा. घोरपडे नाट्यगृहात आयोजित करणेत यावा.

महिला दिनानिमित्त विविध उपक्रम आयोजित करणेकरीता उपलब्ध होणारा कालावधी विचारात घेता महिला महोत्सव उपक्रम आयोजनाकरीता खुल्या बाजारातुन अल्पमुदतीच्या कोटेशन द्वारे दर उपलब्ध करुन आवश्यकतेनुसार इव्हेंट मॅनेजमेंट व्यक्ती अथवा संस्था यांची नियुक्ती करुन महिला महोत्सव अंतर्गत आयोजित करणेत येणारे सर्व उपक्रम सदर इव्हेंट मॅनेजमेंट यांचे मार्फत घेणेस मान्यता देणेत येत आहे.

या उपक्रमात शहरातील उद्योजक महिला / महिला बचत गट यांचे उत्पादित केलेल्या मालाची विक्री व प्रदर्शन यासाठी नाट्यगृह आवारात स्टॉल उभारणी करावी. तसेच सदर स्टॉल करीता प्रतिदिन रु. १००/- प्रमाणे चार दिवसांसाठी रु ४००/- आकारणी करणेत यावी. सदरचे स्टॉल उभारणीचे काम इव्हेंट मॅनेजमेंट यांचेकडूनच करुन घेणेत यावे. या सर्व उपक्रमाकामी रक्कम रु. ३० लाखाचे खर्चास मान्यता देणेत येत आहे. यासाठी आवश्यक अर्थसंकल्पीय तरतुद / वर्गीकरण करणेचे अधिकार मा. आयुक्त यांना देणेत येत आहेत.

या महिला महोत्सव अंतर्गत राबविणेत येणारे विविध उपक्रम निश्चित करणे व आयोजित करणे याकरिता आवश्यकतेनुसार पुढील कार्यवाही करणेचेही अधिकार मा. आयुक्त यांना देणेत येत आहेत.

सूचक : (स्वाक्षरी) म. शि. हिंगमिरे.    अनुमोदक : (स्वाक्षरी) सौ. स. प्र. भिसे.

ठराव सर्वानुमते मंजूर
(स्वाक्षरी)
महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner